PAHM-15013(11)/26/2025-FIN

राजीनामा मंजूर करणेबावत...
श्री.प्रदयुम्न राजेंद्र बोंदर्डे, कनिष्ठ सहाय्यक(लेखा) गट-क,
पंचायत समिती श्रीगोंदा, जिल्हा परिषद अहिल्यानगर.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
अर्थ विभाग
आदेश जा.क्र.अर्थ/कार्या-१/आस्था-१/१९३/२०२५
अहिल्यानगर दिनांकः- ०६/०६/२०२५

वाचा- १. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय जा.क्र.एसआरव्ही-१०९२/१०३३/प्र.क्र.-३३/ ९२/८ दिनांक ०२ डिसेंबर १९९७
२. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचेकडील नियुक्ती आदेश क्र. अर्थ/कार्या-१/आस्था-१/२१६/२०२४ दिनांक ३०/०७/२०२४
३. गट विकास अधिकारी, पंचायत समिती श्रीगोंदा यांचेकडील पत्र जा.क्र.वशि/आस्था-१/ ७४१/२०२५ दिनांक २३/०५/२०२५ तसेच प्राप्त सुधारीत प्रमाणपत्रे दि.०३/०६/२०२५ व सहपत्रातील श्री.वोंदर्डे, कनिष्ठ सहा.(लेखा) यांचा राजीनामा अर्ज दिनांक २२/०४/२०२५.

ज्याअर्थी, श्री.प्रदयुम्न राजेंद्र बोंदर्डे, कनिष्ठ सहाय्यक (लेखा), पंचायत समिती श्रीगोंदा, जि.प.अहिल्यानगर यांनी कनिष्ठ सहाय्यक (लेखा) या पदाचा राजीनामा दिनांक २२/०४/२०२५ रोजीच्या अर्जान्वये संदर्भ क्रमांक ३ अन्वये मंजूरीस्तव या कार्यालयास सादर केलेला आहे.

ज्याअर्थी, श्री.प्रदयुम्न राजेंद्र बोंदर्डे, कनिष्ठ सहाय्यक (लेखा), पंचायत समिती श्रीगोंदा हे इकडील संदर्भ क्रमांक २ मधील नियुक्ती आदेशा अन्वये कनिष्ठ सहाय्यक (लेखा) या पदावर दिनांक २६/०८/२०२४ रोजी पंचायत समिती श्रीगोंदा, जि.प.अहिल्यानगर येथे हजर झालेले आहेत. श्री.बोंदर्डे यांनी कनिष्ठ सहाय्यक (लेखा) गट-क या पदाचा राजीनामा दिनांक २२/०४/२०२५ रोजी दिला असून संदर्भ क्रमांक १ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार तसेच संदर्भ क्रमांक ३ अन्वये कार्यालय प्रमुखांनी श्री.बोंदर्डे यांचे एक महिन्याचे मुळ वेतन संबंधित लेखाशिर्षाखाली भरणा करुन चलनाची प्रत सादर केलेली आहे.

श्री.प्रदयुम्न राजेंद्र बोंदर्डे, कनिष्ठ सहाय्यक (लेखा), पंचायत समिती श्रीगोंदा, यांचेकडे कोणत्याही प्रकारचे शासकीय येणे प्रलंबित नसलेने व कोणत्याही प्रकारची चौकशी चालू अथवा प्रलंबित नसलेबावतचा प्रमाणपत्र सादर केलेले आहे.

त्याअर्थी, संदर्भ क्रमांक १ मधील शासन निर्णयातील तरतुदीनुसार व संदर्भ क्रमांक ३ च्या अर्जानुसार मी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन श्री.प्रदयुम्न राजेंद्र बोंदर्डे, कनिष्ठ सहाय्यक (लेखा) गट-क या पदाच्या राजीनाम्यास मान्यता देत आहे.

सदरचा आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२५०६ ०६०५००३६ असा आहे. सदरचा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

**Signed by Anand Subhashlal Bhandari**
**Date: 06-06-2025 17:30:36**

(आनंद भंडारी भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,
श्री.प्रदयुम्न राजेंद्र बोंदर्डे, कनिष्ठ सहाय्यक (लेखा), पंचायत समिती श्रीगोंदा.
व्दारा व प्रत- गट विकास अधिकारी, पंचायत समिती श्रीगोंदा, जि.प. अहिल्यानगर.
२/-सदर आदेशाची नोंद श्री.बोंदर्डे यांच्या मुळ सेवापुस्तकात घेण्यात यावी. तसेच सदर आदेश श्री.बोंदर्डे यांना बजावून दिनांकीत स्वाक्षरीची प्रत दप्तरी दाखल करावी. प्रस्तुत बावत श्री.बोंदर्डे यांचेकडे कोणत्याही प्रकारे थकबाकी / येणेबाकी नसल्याची खात्री करुन आदेशाची अंमलबजावणी करावी.
प्रत- मुळ नस्ती.